# जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन

देगलूर, ता.२३ : येथील देगलूर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन प्र. प्राचार्य डॉ. संजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. (ता.२३) एप्रिल हा विल्यम शेक्सपीयर यांच्या स्मृती पित्यर्थ जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने ग्रंथालयात विविध महापुरुषांच्या आत्मचरित्रात्मक ग्रंथांचे प्रदर्शन करण्यात आले. प्रारंभी विल्यम शेक्सपीयर यांच्या प्रतिमेचे पुजन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. संजय पाटिल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रंथप्रदर्शनास सुरुवात करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. विठ्ठल जंबांले, हिंदी विभागप्रमुख डॉ. संतोष येरावार, ग्रंथपाल साईनाथ शिंदे, प्रा. दासरवार, प्रा. मलूरवार, सहायक ग्रंथपाल श्रीनिवास नाईक, इंगळे, गोविंदवार बालाजी व महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.